सत्य प्रभा दि. ०८/०१/२०२३.

## व्हिडीओ सिनेमा चालकाच्या लूटप्रकरणी

# तीन आरोपींना अटक; १ लाख २८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त



नांदेड, दि.७ (प्रतिनिधी)–व्हिडीओ सिनेमा चालकास अडवून मारहाण करत लूट केल्याप्रकरणी तीन आरोपींना अटक करुन पोलिसांनी आरोपींकडील मोबाईल, मोटार सायकल, एक ओप्पो कंपनीचा मोबाईल, एक ३ ग्रॅम सोन्याची अंगठी, एक ४ ग्रॅम सोन्याची अंगठी, एक गळयातील सोन्याची चैन, नगदी २ हजार असा १ लाख २८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहराच्या नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी फिर्यादी सतीश पि.रमेशलाल राठौर या व्हिडीओ सिनेमा चालकास आपल्या घरी वसरणीकडे धनेगाव चौक मार्गे जात असताना राजराजेश्वर ऑटोमोबाईल्स दुकानासमोर एका काळ्या रंगाच्या मोटार सायकल एमएच २६– ७६११ या गाडीवरील तिघांनी अडविले व खंजरने त्यांच्या डाव्या हाताचे अंगठ्यावर जबर वार करून नगदी ३,५०० रुपये, रेडमी कंपनीचा मोबाईल, दोन सोन्याच्या अंगठ्या, गळ्यातील सोन्याची चैन असा एकूण ५९,५०० रुपयेचा ऐवज व इतर साहित्य जबरीने चोरून नेले होते. सदर गुन्ह्यात आरोपी शेख मुखीद ऊर्फ गुजर पि.शेख नईम वय २२ वर्ष, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. मोहमदीया कॉलनी वाजेगाव, शेख इलीयास पि.शेख खदीर वय २१ वर्ष व्यवसाय बेकार व सय्यद आतीक पि. सय्यद हुस्सेन

<< पान दोनवर

सत्य प्रभा दि. ०८/०१/२०२३.